नगर Branch

**विषय** - रोखीकरण (सिक्युरिटायझेशन) व वित्तीय मत्तेची पुनर्रचना आणि प्रतिभूती हितसंबंधाची अंमलबजावणी अधिनियम,2002 नूसार मालमत्तेचा ताबा मिळणेबाबत.

**संदर्भ** - 1) श्री.धिरेंद्र कुमार, प्राधिकृत अधिकारी, लक्ष्मी कारंजा, समाचार, नगर, तालुका नगर जिल्हा अहमदनगर यांचा अर्ज दि.19/07/2022.

2) रोखीकरण (सिक्युरिटायझेशन) व वित्तीय मत्तेची पुनर्रचना आणि प्रतिभूती हितसंबंधाची अंमलबजावणी अधिनियम, 2002

3) इकडील आदेश क्र.डी.सी/एस.आर./सिक्यु केस/204/2019,दि.15/03/2019

---

**क्र.डी.सी./एस.आर./सिक्यु केस क्र./537/2022** **आदेश** **अहमदनगर दि.31/03/2023**

---

**ज्याअर्थी,** अर्जदार सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शाखा कार्यालय, लक्ष्मी कारंजा, समाचार, नगर, तालुका नगर जिल्हा अहमदनगर यांचे प्राधिकृत अधिकारी, श्री.धिरेंद्र कुमार, यांनी दि.19/07/2022 रोजी अर्ज देऊन विनंती केली आहे की, कर्जदार श्री.जब्बार गफुर शेख, रा.घर नं.51, बी-11, झिशान कॉलनी, मुकुंदनगर, नगर, तालुका नगर जिल्हा अहमदनगर व इतर यांनी मौजे नागरदेवळे, तालुका नगर जिल्हा अहमदनगर येथील स.नं.242/1 मधील प्लॉट नं.67 चे क्षेत्र 212.5 चौ.मी. यापैकी पुर्वेकडील 71.25 चौ.मी. व त्यावरील बांधकाम क्षेत्र 150 चौ.मी. ही मिळकत तारण ठेऊन अर्जदार सेंट्रल बँक ऑफ इंडीया यांचेकडून रक्कम रुपये 20,00,000/- इतके कर्ज घेतलेले आहे.

**ज्याअर्थी,** अर्जदार बँक यांनी रोखीकरण(सिक्युरिटायझेशन) व वित्तीय मत्तेची पुनर्रचना आणि प्रतिभूती हितसंबंधाची अंमलबजावणी अधिनियम, 2002 मधील कलम 13(2) नुसार दि. 05/04/2021 अन्वये नोटीस देवून एकुण येणे कर्ज रक्कम रू.17,85,135/- मात्र व त्यावरील व्याज ही रक्कम नोटीस मिळालेपासुन 60 दिवसांचे आत भरणे कामी कर्जदार यांना कळविले आहे. तथापि, सदर कर्जदार हे कर्ज परत फेड करत नसल्याने सदर मालमत्तेचा ताबा रोखीकरण(सिक्युरिटायझेशन) व वित्तीय मत्तेची पुनर्रचना आणि प्रतिभूती हितसंबंधाची अंमलबजावणी अधिनियम,2002 मधील कलम 14 प्रमाणे मिळकतीचा ताबा मिळणेबाबत विनंती अर्ज केलेला आहे.

**ज्याअर्थी,** प्रस्तुतच्या केसमध्ये अर्जदार बँक यांनी रोखीकरण (सिक्युरिटायझेशन) व वित्तीय मत्तेची पुनर्रचना आणि प्रतिभूती हितसंबंधाची अंमलबजावणी अधिनियम,2002 मधील तरतुदीनुसार प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर केला असुन, अर्जदार बँक यांनी खालील कागदपत्रांची पुर्तता केलेली आहे.

| अ.क्र. | तपशिल |
|---|---|
| 1. | सेंट्रल बँक ऑफ इंडीया नोंदणिकृत असलेबाबत पुरावा. |
| 2. | मौजे नागरदेवळे, तालुका नगर जिल्हा अहमदनगर येथील स.नं.242/1 मधील प्लॉट नं.67 चे क्षेत्र 212.5 चौ.मी. यापैकी पुर्वेकडील 71.25 चौ.मी. व त्यावरील बांधकाम क्षेत्र 150 चौ.मी. ही मिळकत तारण ठेऊन अर्जदार सेंट्रल बँक ऑफ इंडीया यांचेकडून रक्कम रुपये 20,00,000/- इतके कर्ज घेतलेबाबत प्रत. |
| 3. | तारण मिळकतीचा उतारा. |
| 4. | कर्जदार यांना कर्ज रक्कम भरण्याकामी रोखीकरण (सिक्युरिटायझेशन) व वित्तीय मत्तेची पुनर्रचना आणि प्रतिभूती हितसंबंधाची अंमलबजावणी अधिनियम, 2002 मधील कलम 13(2) नुसार दि.05/04/2021 अन्वये नोटीस |
| 5. | रोखीकरण (सिक्युरिटायझेशन) व वित्तीय मत्तेची पुनर्रचना आणि प्रतिभूती हितसंबंधाची अंमलबजावणी अधिनियम, 2002 मधील कलम 14(1) मधील तरतूदीनुसार आवश्यक असलेले प्रतिज्ञापत्र. |